# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

उपजिल्हाधिकारी भूसंपादन (अ.व.प्र. क्र. ४)
नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, कॅम्प अमरावती - ४४४ ६०२
दूरध्वनी क्रमांक ०७२१-२६६३४४९, फॅक्स ०७२१-२६६२८४३
ईमेल : slaouwp४@gmail.com वेबसाईट : amravati.nic.in

क्र.अ.का./विभूसअ.(अवप्र)क्र.४/कावि- ५७५ /१९ दिनांक : ११ / ७ /२०१९

**खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेणेबाबत.**

**- जाहीर नोटीस -**

**वाचा :-** १) शासन निर्णय महसुल व वनविभाग क्र.संकिर्ण०३/२०१५/प्र.क्र.२४/अ-२/दि.१२/०५/२०१५
२) शासन निर्णय महसुल व वनविभाग क्र.संकिर्ण०३/२०१५/प्र.क्र.२४/अ-२/दि.३१/०५/२०१५
३) म.शा.महसुल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.एलक्युएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/भाग/अ-२/मंत्रालय, मुंबई -४०००३२ दिनांक २५/०१/२०१७

भूसंपादन प्रकरण क्र.२०/४७/२०१७-१८
**मौजा - ब्राम्हणवाडा पाठक**
तालुका - चांदुर बाजार
जिल्हा - अमरावती.

ज्या अर्थी कार्यकारी अभियंता , मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपूर यांनी **पूर्णा मध्यम प्रकल्पाच्या रशिदपूर वितरिकेवरील लघुपाट क्र.१ अंत्य टोकावरुन अतिवाहीनी नाल्याच्या कामाकरीता** प्रयोजनाकरिता शासन निर्णय महसुल व वन विभाग क्र.०३/२०१५ / प्र.अ.३४/अ-२/दि.१२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपूर यांचे नावे घेण्याबाबत त्यांचे पत्र ७०५/२०१८ दि.२८/०२/२०१८ नुसार भूसंपादन प्रस्ताव २०/४७/१७-१८ मौजा ब्राम्हणवाडा पाठक ता.चांदुर बाजार जि.अमरावती एकूण क्षेत्रफळ ०.हे.०८ आर. चा प्रस्ताव जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणी ज्याअर्थी, जिल्हाधिकारी अमरावती यांचे आदेश क्र.२४२/२०१८ दिनांक १४/०३/२०१८ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०५/२०१५ आणि त्या अनुषंगाने शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसुल व वनविभाग क्र.एलक्युएन०१/२०१७ / प्र.क्र.१२/अ-२ दिनांक २५/०१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी आता

१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) अवप्र क्र.४ अमरावती तथा सदस्य सचिव जिल्हास्तरीय समिती अमरावती याव्दारे

**अनुसूची (एक)**

खाजगी क्षेत्रातील जमीनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

आणि

**अनुसुची (दोन)**

प्रकल्पासाठी जमीनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदीपध्दतीने संपादीत करतांना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेडयुल १ च्या तरतुदीनुसार संबंधीत जमीनीसाठी परिगणीत होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

## अनुसूची (तीन)

संबंधीत भूधारकाकडुन शासनाच्या प्रचलीत धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदीपध्दतीने कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधोर विभाग, अमरावती यांचे नावे खरेदी करुन देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपुर्णत : अंतिमरित्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

२) संबंधीत भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

३) संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग,अमरावती यांचे कार्यालयात उपलबध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत

४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखडयाची प्रत कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन् वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तीना तसेच जनतेस निरीभणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

## अनुसूची (चार)

भूसंपादन (सरळ खरेदी ) प्रकरण क्रमांक २०/४७/२०१७-१८ मौजा ब्राम्हणवाडा पाठक तालुका चांदुर बाजार जिल्हा अमरावती **पूर्णा मध्यम प्रकल्पाच्या रशिदपूर वितरिकेवरील लघुपाट क्र.१ अंत्य टोकावरुन अतिवाहीनी नाल्याच्या कामाकरीता** समाविष्ट (खरेदी करावयाच्या) खाजगी जमीनीचा तपशील

| अ.क्र. | भूधारकांचे नाव | मौजा | गट /सर्व्हे क्र | भूधारणा प्रकार | नमुना ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गंगाधर भिमराव वांगे | ब्राम्हणवाडा पाठक | ३६४ | भो.वर्ग १ | २.०२ | ०.०८ |
| **एकूण** | | | | | | ०.०८ |

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)**
**अ.व.प्र.क्र.४ अमरावती**
**तथा**
**सदस्य सचिव**